
साप्ताहिक चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ७
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. ३० मार्च ते ५ एप्रिल २०२६
संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले
RNI No. MAHMAR/2011/35979

# महाराष्ट्र नागवा झाला!



संपादकीय
घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

देवेंद्र फडणवीस जेव्हा महाराष्ट्राचे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी 'राज्यसत्तेपेक्षा धर्मसत्ता महत्त्वाची' अशा आशयाचे एक विधान केले होते. त्यावरून बरेच वादळ निर्माण झाले होते. आता अशोक खरात याच्यासारख्या एका भोंदूचे कारनामे पुढे आल्यानंतर त्याच्या मुसक्या आवळल्याचे श्रेयही हेच फडणवीस आपल्याकडे घेत आहेत. एकीकडे 'पुरोगामी महाराष्ट्र' अशी संकल्पना सातत्याने मांडत असताना दुसरीकडे सर्वाधिक अंधश्रद्धाही आपल्याच राज्यात पोसल्या जात आहेत. मनाने खचलेले, कोणत्या ना कोणत्या संकटात सापडलेले, क्षमतेपेक्षा खूप काही मिळवण्याचा हव्यास असलेले, भीतीच्या सावटाखाली असलेले, व्यसनाच्या आहारी गेलेले अनेक जण अशा बुवा-बाबांच्या फसवणुकीला बळी पडतात. त्यातून आजचा महाराष्ट्र शब्दशः नागवा झाला आहे.

अशोक खरातचे उघड झालेले आणि होत असलेले कारनामे पाहता हे इथल्या चळवळीचेही धडधडीत अपयश आहे, हे मान्य करावे लागेल. खरातपाठोपाठ चर्चेत आलेले नरहरी झिरवळ प्रकरण, वसईचा स्वयंघोषित धर्मगुरु हृषिकेश वैद्य याने 'मी तुझा शंकर, तू माझी पार्वती' म्हणत पुण्यातील एका ३५ वर्षीय महिलेवर केलेले अत्याचार ही प्रकरणे कशाचे द्योतक म्हणावीत? खरातच्या एकापाठोपाठ एक ज्या चित्रफिती समाजमाध्यमावर येत होत्या त्यानंतर यातील पीडित महिलांच्या चारित्र्यावरही अनेकांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले. त्यात काही अधिकारी, एक खासदार, आमदाराची बायको अशा अनेक जणी असल्याने या सर्वांना त्याने कसे संमोहित केले याबाबत चर्चा सुरू झाली. 'या स्वतः हून माझ्याकडे आल्या, मी कुणावरही अत्याचार केले नाहीत,' असा दावा खरातने केलाय. त्या चित्रफितीतील महिलांनी घेतलेला पुढाकार पाहता हा खराच बलात्कार होता की, महिलांनी मोहाला बळी पडून केलेले वासनांध कृत्य होते याचीही चर्चा सुरू आहे.

रूपाली चाकणकरांना या प्रकरणात महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला होता. आता मुख्यमंत्री त्यांची हकालपट्टी करतील, असे वाटत असतानाच चाकणकरांनी 'मी माझ्या स्वेच्छेने राजीनामा देत आहे,' अशी दर्पोक्ती करत 'गिरे तो भी नाक उपर' अशी किळसवाणी वृत्ती दाखवून दिली. खरातच्या डोक्यावर छत्री धरणाऱ्या, त्याच्यापुढे नतमस्तक होणाऱ्या, त्याची पाद्यपूजा करणाऱ्या चाकणकर या आजच्या बरबटलेल्या व्यवस्थेच्या प्रतीक आहेत. 'त्या सेक्स रॅकेट चालवतात, त्यांच्या आयोगाकडे आलेल्या प्रकरणातील पुरुषांकडून पैसे काढतात' असे अनेक आरोप त्यांच्याच पक्षातील काही महिला नेत्यांनी केले आहेत. यात तथ्य असेल तर हे अतिशय लाजीरवाणे आहे.


इथल्या संतपरंपरेने जो विचार दिला, जो संस्कार दिला, जी शिकवण दिली ती खरातसारख्या भोंदूंनी धुळीला मिळवली. त्याच्याकडून मिळणाऱ्या लाभाचा विचार करत त्याला साथ देणाऱ्या राजकारण्यांनी त्याला खतपाणी घातले. धर्म, उपासना, अंधश्रद्धा, कर्मकांड, परंपरा याच्या विरूद्ध ज्या समाजसुधारकांनी आणि गाडगेबाबांसारख्या संतांनी जो संघर्ष केला त्याचा पराभव या मंडळींनी केला आहे. अशोक खरातसारखे भोंदू बाजूला ठेवा पण महाराष्ट्रात किंवा देशात आजच्या घडीला जे कोणी साधू असतील, तथाकथित दुकाने थाटून बसलेले संत असतील त्यांच्यापैकी किती जणांनी गाडगेबाबासारखा स्वच्छतेसाठी खराटा हातात घेतला? कुणी भक्त पाया पडत असतील तर तोच खराटा त्याच्या पाठीवर मारणारे गाडगेबाबा कुठं आणि लैंगिक उत्तेजक गोळ्या पाण्यात मिसळून ते 'ओशनोजल' त्यांना प्यायला देणारा अशोक खरात कुठं...? बाबांच्या 'खराट्या'तला आणि सध्याच्या 'खराता'तला हा फरक समजून घेतला पाहिजे. गाडगेबाबांनी अस्पृश्यांसाठी मोफत धर्मशाळा बांधली, ती बांधताना त्या गवंड्याच्या हाताखाली बाबा स्वतः मजूर म्हणून काम करत होते, गाव स्वच्छ केल्यावर एखाद्या मायमाउलीने दिलेली शिळीपाकी भाकरी प्रसाद म्हणून खात होते. खरातसारखे ऑफिस थाटून त्यांनी पैसा गोळा केला नाही की तिथल्या टेबलवर काही गैरकृत्य केले नाही. पन्नास वर्षात गाडगेबाबांनी एक गोड पदार्थ खाल्ला नाही, हे आज कुणाला तरी पटेल का? अनाथांना आधार देणारे, महारोग्याला साबन लावून आंघोळ घालणारे गाडगेबाबा याच भूमित होऊन गेलेत!

आजच्या महाराष्ट्राचे चित्र काय आहे? कुणी म्हणतं, 'मी दिलेले आंबे खाल्ल्यानं मुलं होतात', कोणी म्हणतं, 'मी कृष्ण तू राधा...' महाराष्ट्राची ही इतकी घसरण होत असताना आपले नेते काय करतात? थोडेथोडके नव्हे तर तब्बल ३९ आमदार खरातच्या दर्शनासाठी आले होते. महाराष्ट्राचा शिक्षणमंत्री राहिलेला दीपक केसरकरसारखा ज्येष्ठ आमदार याचे निर्लज्ज समर्थन करताना काय म्हणतो, ''जर खरातकडे ३९ आमदार गेले होते तर मग माझेच नाव का घेता...?'' म्हणजे इतरांनी शेण खाल्ले तर मी खाल्लेली विष्ठाही पंचपक्वान्न होते, असे त्यांना सांगायचे असावे. लाज काढलीय या मंडळींनी महाराष्ट्राची! थू यांच्या जिंदगानीवर!! ज्येष्ठ विचारवंत बाळासाहेब भारदे एके ठिकाणी लिहितात, ''या देशात अनेक ज्ञानी झाले. अनेक भक्त झाले. योगी, संत आणि तत्त्वज्ञ झाले. त्यांनी केवळ आपल्या उद्धारासाठी प्रयत्न केले. त्यामुळे कदाचित त्यांना ब्रह्मानंद मिळाला असेलही! पण सामान्य माणसाच्या उद्धाराचा प्रयत्न त्यांनी केला नाही. त्यांना आनंद झाला असला तरी लोकांना मात्र झाला नाही. हा संगम गाडबेबाबा आणि महात्मा गांधी यांच्या ठायी होता.''



आहेत का कोणी असे महात्मे आजच्या महाराष्ट्रात? की इथली आदर्शांची, संस्कारांची परंपरा मेलेली आहे? मुर्दाड मानसिकता असल्याशिवाय आपण असे उद्योग सहन करूच शकत नाही. जगात आपलेच दुःख मोठे आहे, असा समज असणारे अशा भोंदूंना शरण जातात पान ८ वर ▸▸

लवकरच
प्रकाशित होत आहे...




रेल्वेत अभियंता होणं आणि राष्ट्राची सेवा करणं ही निश्चितच गौरवाची आणि अभिमानाची बाब म्हणावी लागेल. हे यश साध्य करतानाच आपल्याशी संबंधित सर्वांच्याच आणि आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या भल्याचाच विचार करणं म्हणजे तर दुर्मीळात दुर्मीळ बाब म्हणावी लागेल.
**डॉ. शरद टेंभेकर** यांनी ही किमया साधली आहे. म्हणूनच ते म्हणतात, माझ्या आयुष्यात संघर्ष असा कधी आलाच नाही. मला सगळी चांगलीच माणसं भेटली!
अशा सुखी माणसाचा सदरा परिधान केलेल्या या सुहृदय अभियंत्याची ही गौरव गाथा नक्की वाचा...


चपराक प्रकाशन
www.chaprak.com
ईमेल : info@chaprak.com
वेब साईट : www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०

# कलम ६६अ चा वापर बेकायदेशीर



ॲड. स्वप्निल श्रोत्री
पुणे
८९५६८०१२४०

**मानवजातीने २१व्या शतकात अनुभवलेली सर्वात मोठी क्रांती म्हणजे माहिती आणि तंत्रज्ञानाची क्रांती होय. इंटरनेटच्या आगमनानंतर जग एका 'ग्लोबल व्हिलेज'मध्ये परिवर्तित झाले आहे. आज समाजमाध्यमे, ब्लॉग्स, ऑनलाइन न्यूज प्लॅटफॉर्म आणि विविध डिजिटल साधनांमुळे प्रत्येक व्यक्ती केवळ माहितीचा ग्राहक नसून माहितीचा निर्माता देखील बनला आहे. या बदलामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अभूतपूर्व विस्तार मिळाला आहे.**




लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नागरिकांना आपल्या विचारांचे, मतांचे आणि भावनांचे, स्वातंत्र्याचे प्रकटीकरण करता येणे ही एक सुदृढ लोकशाहीची ओळख आहे; मात्र या स्वातंत्र्यासोबत काही जबाबदाऱ्या आणि मर्यादाही येतात. डिजिटल माध्यमांमुळे माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने आणि व्यापक प्रमाणात होतो. त्यामुळे चुकीची माहिती, द्वेषपूर्ण भाष्य, अफवा आणि दिशाभूल करणारे संदेश यांचा समाजावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

याच पार्श्वभूमीवर, सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि ऑनलाइन व्यवहारांना कायदेशीर चौकट देण्यासाठी भारत सरकारने माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० लागू केला. या अधिनियमामध्ये विविध तरतुदींचा समावेश करण्यात आला, ज्यामध्ये कलम ६६अ हे विशेषतः इंटरनेटवरील आक्षेपार्ह संदेशांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार करण्यात आले होते.

कलम ६६अ अंतर्गत 'आक्षेपार्ह', 'धमकीवजा' किंवा 'त्रासदायक' अशा स्वरूपाच्या ऑनलाइन संदेशांसाठी शिक्षा करण्याची तरतूद होती परंतु या शब्दांची स्पष्ट व्याख्या नसल्यामुळे या कायद्याचा वापर अनेकदा मनमानी पद्धतीने करण्यात आला. सामान्य नागरिकांना समाजमाध्यमांवर व्यक्त केलेल्या मतांवरून अटक होण्याच्या घटना वारंवार समोर आल्या, ज्यामुळे या कायद्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले.

२०१५ मध्ये 'श्रेया सिंघल वि. भारतीय संघराज्य' या ऐतिहासिक खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६अ हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारे आणि घटनाबाह्य असल्याचे घोषित करून रद्द केले. तरीसुद्धा त्यानंतरही अनेक वेळा तपास यंत्रणांकडून गुन्हा नोंदविताना या रद्दबातल कलमाचा वापर झाल्याचे दिसून येते. याहूनही गंभीर बाब म्हणजे काही कनिष्ठ न्यायालयांनी या कलमाच्या आधारे शिक्षा सुनावल्याची उदाहरणे समोर आली आहेत. पुढे उच्च न्यायालयात अपील केल्यानंतर अशा शिक्षा रद्द करून आरोपींना निर्दोष मुक्तता देण्यात आली आहे.

सदर परिस्थिती न्यायव्यवस्थेतील समन्वयाचा अभाव, कायद्याविषयी अपुरी जाणीव आणि अंमलबजावणीतील त्रुटी याकडे निर्देश करते. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय संपूर्ण देशासाठी बंधनकारक असतानाही त्यांची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे संबंधित यंत्रणांना कायद्याविषयी अद्ययावत माहिती देणे, अधिक प्रभावी प्रशिक्षण देणे आणि जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण धोक्यात येण्याची शक्यता कायम राहील.

**कलम ६६अ ची व्याख्या काय सांगते?**

माहिती तंत्रनज्ञान अधिनियम, २००० मध्ये कलम ६६अ ची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे...

संपर्क सेवा इत्यादींमार्फत आक्षेपार्ह संदेश पाठवल्याबद्दल शिक्षा. संगणकीय साधन किंवा संप्रेषण उपकरणाच्या माध्यमातून पाठवणारी कोणतीही व्यक्ती –

(अ) अत्यंत आक्षेपार्ह किंवा धमकीवजा स्वरूपाची कोणतीही माहिती; किंवा

(ब) जी माहिती खोटी आहे हे त्याला माहीत असूनही, अशा संगणकीय संसाधनाचा किंवा संप्रेषण उपकरणाचा वापर करून सातत्याने त्रास, गैरसोय, धोका, अडथळा, अपमान, इजा, गुन्हेगारी धमकी, वैर, द्वेष किंवा वाईट भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने;

(क) त्रास किंवा गैरसोय निर्माण करण्याच्या उद्देशाने किंवा अशा संदेशांच्या उगमाबद्दल प्राप्तकर्त्यांची किंवा प्राप्तकर्त्याची फसवणूक करण्याच्या किंवा दिशाभूल करण्याच्या उद्देशाने केलेले कोणतेही इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेल संदेश करेल किंवा पाठवेल त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण** – या कलमाच्या उद्देशासाठी, 'इलेक्ट्रॉनिक मेल' आणि 'इलेक्ट्रॉनिक मेल संदेश' या संज्ञा म्हणजे संगणक, संगणक प्रणाली, संगणक संसाधन किंवा संप्रेषण उपकरणावर तयार केलेला, प्रसारित केलेला किंवा प्राप्त केलेला संदेश किंवा माहिती, ज्यामध्ये मजकूर, प्रतिमा, ऑडिओ, व्हिडिओ आणि संदेशासोबत प्रसारित केल्या जाऊ शकणाऱ्या इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डमधील संलग्नकांचा समावेश आहे.

**श्रेया सिंघल वि. भारतीय संघराज्य, २०१५**

नोव्हेंबर २०१२ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर मुंबईत बंद पाळण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर मुंबईत शिक्षणासाठी आलेल्या एका तरुणीने फेसबुकवर बंदविरोधात नाराजी व्यक्त करणारी पोस्ट लिहिली. दुसऱ्या एका तरुणीने त्या पोस्टला 'लाईक' करून समर्थन दर्शवले. या घटनेमुळे काही शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेतली आणि परिस्थिती तणावपूर्ण झाली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलिसांनी हस्तक्षेप करून दोन्ही तरुणींना अटक केली आणि त्यांच्याविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६अ अंतर्गत गुन्हा नोंदवला.

सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर श्रेया सिंघल यांनी सर्वोच्च न्यायालयात भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत रिट याचिका दाखल करून कलम ६६अ घटनाबाह्य ठरवण्याची मागणी केली. त्यांचा मुख्य युक्तिवाद असा होता की, हे कलम भारतीय राज्यघटनेतील कलम १९(१)(अ) अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते. याचिकेत असेही नमूद करण्यात आले की, या कलमातील 'आक्षेपार्ह', 'धमकीवजा' आणि 'त्रासदायक' यांसारखे शब्द अत्यंत अस्पष्ट व व्यापक आहेत. त्यामुळे कायद्याचा अर्थ लावताना मनमानी होऊ शकते आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. परिणामी, लोक सामाजिक माध्यमांवर आपली मते व्यक्त करण्यास घाबरतात. फेसबुक पोस्ट किंवा इतर माध्यमांवर राजकीय मत व्यक्त केल्यामुळे अटक झाल्याच्या घटनांमुळे या कायद्याचा गैरवापर होत असल्याची भावना बळावली.

**सर्वोच्च न्यायालयाने ह्या खटल्यात पुढील प्रश्नांवर विचार केला :**

१. कलम ६६अ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करतो का?
२. या कलमातील शब्दप्रयोग अस्पष्ट आहेत का?
३. कायदा राज्यघटनेतील कलम १९(२) अंतर्गत येणाऱ्या वाजवी मर्यादांमध्ये बसतो का?

२०१५ मध्ये ने या खटल्यात श्रेया सिंघल यांचा युक्तिवाद मान्य करत माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६अ पूर्णपणे घटनाबाह्य ठरवले. न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले की, या कलमातील शब्दांची अस्पष्टता कायद्याचा चुकीचा व मनमानी अर्थ लावण्यास कारणीभूत ठरते. तसेच अटकेच्या भीतीमुळे नागरिक स्वतःची मते व्यक्त करण्याचे टाळतात, जे लोकशाहीसाठी घातक आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षणही नोंदवले.

**रिट याचिका म्हणजे काय?**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयांना विशेष अधिकार दिले आहेत. या अधिकारांचा प्रभावी उपयोग करण्यासाठी रिट याचिका ही एक महत्त्वाची कायदेशीर साधनव्यवस्था आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तिचे मूलभूत अधिकार (भारतीय राज्यघटनेचा भाग ३ हा मूलभूत अधिकारांशी संबंधित आहे) भंग होतात, तेव्हा तो थेट सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करू शकतो. रिट म्हणजे न्यायालयाने दिलेला एक आदेश होय. हा आदेश शासन, सरकारी अधिकारी किंवा इतर प्राधिकरणांना त्यांच्या कायदेशीर कर्तव्यांचे पालन करण्यास भाग पाडण्यासाठी दिला जातो.

कलम ३२  सर्वोच्च न्यायालय (मलभूत अधिकारांसाठी)

कलम २२६  उच्च न्यायालय (मूलभूत अधिकार आणि इतर कायदेशीर अधिकार)

**रिट याचिकांचे प्रकार** : भारतीय न्यायव्यवस्थेत पाच प्रमुख प्रकारच्या रिट्स मान्य आहेत:

**१. हेबियस कॉर्पस –**

हेबियस कॉर्पस हा लॅटीन शब्द असून ह्याचा अर्थ 'शरीर न्यायालयासमोर सादर करा' असा होतो. थोडक्यात, पोलीस किंवा तपासयंत्रणांनी बेकायदेशीर अटकेत ठेवलेल्या व्यक्तीची मुक्तता करणे किंवा त्या व्यक्तिची काहीच माहिती पोलिसांकडून उपलब्ध होत नसेल किंवा ती व्यक्ती अटकेत आहे परंतु ती कोणत्या परिस्थितीत आहे याची माहिती जर उपलब्ध होत नसेल तर हेबियस कॉर्पस रिटचा वापर केला जातो.

**हेबियस कॉर्पस कधी वापरतात?**

१. पोलिसांनी बेकायदेशीर अटक केली असल्यास.

२. एखाद्या व्यक्तिला बळजबरीने कैदेत ठेवले असल्यास.

**पान ८ वर ▸▸**

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद–विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# संस्थांच्या कार्यक्रमांमुळे सामान्यांचे हाल



सचिन सुंबे
लोणी काळभोर
९१४६०९७१७१

पूर्व हवेली वृत्तांत

**पूर्व हवेलीत अनेक छोट्या, मोठ्या संस्था असून त्यांचे कार्यक्रम नेहमी चालू असतात. कार्यक्रम असताना संस्था फक्त स्वतःच्या फायद्याचा विचार करतात. वाहतूक कोंडीत अडकलेला सामान्य नागरिक त्यांना दिसत नाही. व्हीआयपींची सुरक्षा महत्त्वाची तर आहेच पण त्याचा फटका सामान्य माणसाला बसता कामा नये. महामार्ग निर्मनुष्य करताना संस्थांनी तितकीच काळजी घेऊन पोलीस प्रशासन व शासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे. दर आठवड्याला पुणे-सोलापूर महामार्गावर कुठल्या न कुठल्या संस्था कार्यक्रम घेत असतात पण त्यात भरडला जातो सामान्य नागरिक. त्यामुळे यापुढे कार्यक्रम घेताना वाहतूक कोंडीचे व बसचे आयोजन करणे महत्त्वाचे असल्याची चर्चा पूर्व हवेलीतील नागरिकांमध्ये चालू आहे.**



**नुकताच उरुळी कांचन येथे देशाचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचा दौरा आयोजित केला होता. निसर्गोपचार आश्रमात हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यामुळे अतिशय कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. या सुरक्षा व्यवस्थेमध्ये सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले. रविवारी उपराष्ट्रपतींचा दौरा तसेच लोणी काळभोर येथील एमआयटी कॉलेजमध्ये पोलीस भरतीची परीक्षा असल्याने पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गर्दी होती.**

उपराष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे हा रस्ता काही वेळासाठी बंद केला होता. तसेच उरुळीकांचन आणि लोणी काळभोर परिसरातील अंतर्गत रस्ते पूर्णपणे बंद करण्यात आले. या निर्णयाचा फटका मात्र थेट सर्वसामान्य नागरिक आणि हजारो विद्यार्थ्यांना बसला. या सर्व गोष्टी पाहता सामान्य नागरिकांना होणारा त्रास या संस्थांच्या का बरं लक्षात येत नाही? या सगळ्या प्रकारांमुळे नागरिकांत प्रचंड चीड आहे. तसेच संस्थांच्या कार्यक्रमात सामान्य नागरिकच भरडला जातो हेही वेळोवेळी दिसून येते.

उरुळीकांचन येथील निसर्गोपचार आश्रमाचा स्थापना दिन सोहळा व 'सिक्रेट्स ऑफ अवर हॅपिनेस' या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आले होते. त्याचवेळी एमआयटी शैक्षणिक संकुलात पोलीस भरतीची परीक्षा देण्यासाठी हजारो विद्यार्थी सुद्धा रविवारी आले होते. या दोन्ही कार्यक्रमांचे नियोजन एकाच दिवशी आल्याने वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे फज्जा उडाला. रविवारी सकाळपासूनच महामार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. उपराष्ट्रपती येताना व जाताना महामार्ग उरुळीकांचनपासून पूर्णपणे बंद ठेवण्यात आला होता. उपराष्ट्रपतींच्या सुरक्षेच्या कारणास्तव उरुळीकांचन परिसरातील अंतर्गत रस्ते बंद करण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या घराजवळ पोहोचण्यासही अनेक अडचणींचा सामना करावा लागला. लोणी काळभोर येथील एमआयटी शिक्षण संस्थेमधून परीक्षा संपल्यानंतर हजारो विद्यार्थी एकाच वेळी बाहेर पडल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली. महामार्ग बंद केल्याने पीएमपीएलच्या बसेस सुद्धा अडकून पडल्या. त्यामुळे बसस्थानकांवर विद्यार्थ्यांची झुंबड उडाली. काही विद्यार्थी उन्हात पाच ते सहा किलोमीटर जालत जाऊन मिळेल ते वाहन पकडून जात होते. अनेक विद्यार्थ्यांनी जीव धोक्यात घालून बसच्या दरवाजाला लटकून प्रवास केला. मग प्रश्न उपस्थित होतो की ज्या संस्थेने या परीक्षांचे आयोजन केले होते त्यांनी हडपसर ते संस्थेपर्यंत पीएमपीएलच्या बसची सोय (फुकट नाही) करायला पाहिजे होती. विद्यार्थ्यांसाठी कोणतीही पर्यायी वाहतूक व्यवस्था न केल्याने परिसरातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागील वेळी सुद्धा परीक्षा संपल्यावर हजारो विद्यार्थ्यांना असा अडचणीचा सामना करावा लागला होता. या संपूर्ण घटनेत पोलीस आणि प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुढे आला आहे. एका बाजूला व्हीआयपींच्या सुरक्षेला प्राधान्य देताना दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकांचे मात्र हाल होत असल्याचे चित्र स्पष्टपणे समोर आले. व्हीआयपीची सुरक्षा महत्त्वाची तर आहेच पण त्याचा सामान्यांना त्रास होणार नाही याची काळजी संस्थांनी घेतली पाहिजे, असे मत सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब जगताप, सुभाष कड, अनिरुद्ध मराठे यांनी व्यक्त केले.

# माझ्या मराठी मातीचा कधीकधीच लावा टिळा



सचिन माथेफोड
थेऊर, पुणे
८९७५३२९७९७

**मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हे ऐकताना अभिमानाने छाती फुगते! पण हाच अभिमान जेव्हा वास्तवाच्या धक्क्याने कोसळतो तेव्हा प्रश्न पडतो हा सन्मान केवळ कागदावरच मर्यादित आहे का? की आपणच आपल्या भाषेला सन्मानाच्या नावाखाली उपेक्षेची सवय लावून घेतली आहे?**

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी विषय अनिवार्य केला गेला. निर्णय चांगला, हेतूही चांगला; पण अंमलबजावणी? ती मात्र पूर्णपणे दिशाहीन. अनेक नामांकित इंग्रजी शाळांमध्ये मराठीला अपेक्षित तो मान मिळत नाही. मराठी हा 'फक्त एक विषय' बनून राहतो. ना त्याला गांभीर्य, ना सन्मान, ना योग्य अध्यापन. तास भरायचा, पुस्तक पूर्ण करायचं आणि परीक्षा घ्यायची इतकंच.

सरकारने नियम बनवले पण त्याच वेळी त्यांना पळवाटाही उपलब्ध करून दिल्या. नियमांची अंमलबजावणी कडक असावी, अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र 'काहीही चालतं' अशी परिस्थिती दिसते. घोषणांची दणदणाट होते पण जमिनीवर त्या घोषणांचे काय होते, याकडे पाहणारा कोणीच नाही. वरून आदेश खाली गोंधळ आणि मध्ये मराठीची होणारी गळचेपी!

अनधिकृत शाळांची तपासणी करण्यासाठी अधिकारी वर्ग गुपचूप, कधी कधी अर्थकारणांमुळे दुसऱ्यांच्या गाड्यांमधून शाळांमध्ये पोहोचतो ही गोष्ट कौतुकास्पद वाटू शकते पण प्रश्न असा आहे की, या तपासणीत मराठी भाषेच्या अध्यापनाची अवस्था कधी तपासली जाते का? मराठी विषय शिकवला जातो की केवळ नावापुरता ठेवला जातो याचा हिशोब कोण घेतो? या बाबतीत मात्र अधिकारी वर्ग फिरकतानाही दिसत नाही. जणू मराठीचा प्रश्न हा प्रश्नच नाही! याबाबत खरे कारण म्हणजे काय करायला हवे याबाबत माहितीच नाही. तसेच त्यात अधिकारी वर्गाना अर्थ देखील दिसत नसल्याने उगीच वेळ का घालवावा आणि उगीचच का कागदी घोडे नाचवावे हा एक वेगळाच प्रश्न त्यांच्यासमोर कदाचित असावा.

याहूनही गंभीर बाब म्हणजे शिक्षक प्रशिक्षण. शासकीय शाळांमधील शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम नियमितपणे राबवले जातात पण जिथे खऱ्या अर्थाने गरज आहे त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षकांसाठी मराठी विषयाचे कोणतेही सुसंगत, प्रभावी प्रशिक्षण उपलब्ध नाही. बदलत्या जगात, बहुभाषिक वर्गात भाषा कशी शिकवावी, विद्यार्थ्यांना भाषेची गोडी कशी लावावी, डिजिटल साधनांचा वापर कसा करावा या गोष्टींचे प्रशिक्षण अत्यावश्यक आहे पण इथे अजूनही मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहेत.

खरे तर मराठी शिकवण्याची पद्धतच बदलण्याची गरज आहे. आजही मराठी भाषा ही वर्गानुसार शिकवली जाते; पण गरज आहे ती स्तरानुसार शिक्षणाची. एखादा विद्यार्थी दहावीमध्ये असला तरी त्याला मराठीची ओळख नसेल तर त्याला पहिल्या पातळीपासून सुरुवात करण्याची संधी मिळायला हवी. भाषेचा पाया मजबूत न करता थेट अवघड अभ्यासक्रम देणे म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्यायच.

भाषा ही कधीही लादून शिकवता येत नाही. ती मनात रुजवावी लागते, तिची गोडी निर्माण करावी लागते पण आज मराठी शिकवण्याची पद्धत अशी आहे की, विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण होते, प्रेम नाही. 'मराठी शिकायचीच आहे' या बंधनातून 'मराठी शिकावीशी वाटते' या भावनेपर्यंत आपण पोहोचू शकलो नाही, हीच खरी शोकांतिका आहे. परिणामी, परदेशातून येणारी किंवा इतर राज्यांतून थेट दहावीमध्ये प्रवेश घेणारी मुले अचानक मराठीच्या जंजाळात अडकतात. एसएससी बोर्डाच्या धर्तीवरील कठीण अभ्यासक्रम त्यांच्या माथी मारला जातो. कोणतीही पूर्वतयारी नाही, पूरक अभ्यास नाही, फक्त बंधन. अशा वेळी मराठी ही त्यांच्यासाठी भाषा न राहता दडपण बनते.

ही सगळी परिस्थिती पाहिली, की एकच गोष्ट स्पष्ट होते. मराठीच्या नावाखाली केवळ राजकीय पोळी भाजली जात आहे. घोषणांनी मतपेट्या भरल्या जातात पण त्या घोषणांची जबाबदारी मात्र कोणीच घेत नाही. 'वरून आदेश आला, खाली काहीही करा' हीच जणू कार्यपद्धती बनली आहे. सामाजिक उद्देश मागे पडतो आणि राजकीय सोय पुढे येते. मराठीचा खरा सन्मान करायचा असेल तर केवळ दर्जा देऊन भागणार नाही. त्यासाठी ठोस धोरण, स्तरानुसार अभ्यासक्रम, बिगर मराठी विद्यार्थ्यांसाठी वेगळे नियोजन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांसाठी सक्षम, आधुनिक प्रशिक्षण व्यवस्था आवश्यक आहे. तसेच मराठीच्या अंमलबजावणीवर कठोर आणि प्रामाणिक देखरेखही तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा आपण कितीही मोठ्या घोषणा केल्या, तरी वास्तव एकच राहील

**'माझ्या मराठी मातीचा कधीकधीच लावा टिळा'**

आणि हा टिळा लावण्यापुरतीच मराठी माती उरेल, जगण्यापुरती नाही! म्हणून जर माती जगवायची असेल तर भाषा जागवली गेली पाहिजे.

# स्मृतिंच्या आकाशातलं चांदणं





मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४


आज कित्येक दिवसांनी गावी माडीवर झोपण्याचा योग आला. रात्रीचं जेवण आटोपलं आणि नकळत पाय माडीच्या पायऱ्यांकडे वळले. जणू त्या पायऱ्यांनाही माझी चाहूल लागली होती. खूप दिवसांनी भेटलेल्या जुन्या मित्रासारख्या त्या मला शांतपणे वर नेत होत्या. माडीवर पाऊल ठेवताच अंगभर पसरलेलं आकाश माझ्याकडे पाहून हसल्यासारखं वाटलं. आकाशभर विखुरलेल्या चांदण्या मोत्यांसारख्या चमकत होत्या. चंद्रही आज काहीसा जास्तच जवळ वाटत होता. जणू तो हळूच विचारत होता, 'किती दिवसांनी आलास रे!' त्या क्षणी मनात एक विलक्षण शांतता उतरली.

माझा लहान मुलगा माझ्या शेजारी पडला होता. त्याच्यासाठी हे सगळं अगदी नवीन होतं. शहरात वाढलेल्या त्याच्या छोट्याशा डोळ्यांनी इतकं स्वच्छ, इतकं सुंदर आकाश याआधी कधी पाहिलंच नव्हतं. तो आकाशाकडे एकटक पाहत होता. त्याच्या डोळ्यांत चांदण्यांचं प्रतिबिंब चमकत होतं. अचानक तो कुजबुजला, ''बाबा, इतक्या चांदण्या रोज असतात का हो?''

त्या निरागस प्रश्नानं माझ्या मनात दडलेल्या आठवणींचे दरवाजे एकामागून एक उघडू लागले.

लहानपणी आमचं आयुष्य फार साधं होतं पण त्यात एक वेगळी श्रीमंती होती. रात्रीचं जेवण उरकलं की आम्ही सगळी भावंडं गोधड्या घेऊन माडीवर जमायचो. मग सुरू व्हायचा आकाशाशी संवाद. कोणी तारका मोजायचं तर कोणी आकाशात वेगवेगळे आकार शोधायचं. ''तो बघ सप्तर्षी!'', ''अरे, तो तारा हलतोय बघ!'' असं म्हणत आकाशातल्या प्रत्येक चमकत्या ठिपक्याशी आमची मैत्री जुळायची. कधी एखादा तारा तुटताना दिसला की आनंदानं आरडाओरडा व्हायचा. तेवढ्यात बाबा हसत म्हणायचे, ''लवकर इच्छा मागा देव ऐकतो बरं!'' कधी आजीच्या गोष्टी रंगायच्या, कधी भुताखेतांच्या गप्पा ऐकून भीतीने चादरीत शिरायचो तर कधी दुसऱ्या दिवशीच्या खेळांचे बेत आखले जायचे. त्या रात्रींना एक वेगळीच गोडी होती. वाऱ्याची मंद झुळूक, झाडांची सळसळ तर कधी रातकिड्यांचा किर्र आवाज! या सगळ्यात एक अनोखं संगीत दडलं होतं. त्या चांदण्यांच्या साक्षीनं आमचं बालपण नकळत फुलत होतं.

आज शहरात रात्र म्हणजे थकव्याचा शेवट. तिथे शांतता नाही, आकाश मोकळं नाही आणि माणसांना थांबायला वेळही नाही. दिवसभराच्या धावपळीत माणूस स्वतःशी बोलायलाही विसरतो. शहर आपल्याला आधुनिक सुविधा देतं पण त्या बदल्यात ते आपल्याकडून काहीतरी अमूल्य हिरावून घेतं. निसर्गाची जवळीक, माणसांमधली ऊब आणि मनाला मिळणारी शांतता. गावात मात्र अजूनही वेळ थोडा संथ वाहतो. लोक नावानं हाक मारतात, एखाद्या घरात दुःख आलं तर सगळं गाव उभं राहतं आणि सण आला की प्रत्येक अंगण उजळून निघतं. त्या साध्या आयुष्यातही एक खोल समाधान दडलं आहे.


माडीवर पडून हे सगळं मुलाला सांगताना माझा आवाज नकळत भरून आला. माझ्या डोळ्यांतलं पाणी पाहून तो हळूच म्हणाला, ''बाबा तुम्हाला गाव खूप आवडतं ना?''

मी फक्त हलकेच हसलो; कारण त्या अनपेक्षित प्रश्नाचं उत्तर शब्दांत देणं कठीण होतं. आयुष्याच्या गरजांनी आपल्याला शहराशी बांधून ठेवलं आहे; पण मनाचं नातं अजूनही या मातीशीच जोडलेलं आहे.मी त्याच्या केसांवरून अलगद हात फिरवत राहिलो. काही क्षणांतच तो शांत झोपी गेला. चंद्रप्रकाश त्याच्या चेहऱ्यावर अलगद उतरला होता. कदाचित त्याच्या मनातही त्या गोष्टींची छोटीशी चित्रं रंगली असतील. मी मात्र अजूनही जागाच होतो, आकाशाकडे पाहत.

त्या चांदण्यांमध्ये मला माझं बालपण दिसत होतं. माझं हरवलेलं साधं आयुष्य दिसत होतं आणि त्या शांत चांदण्या! रात्री मनात एक विचार अलगद उमटला. आपण आयुष्यभर सुखाच्या शोधात धावत राहतो; मोठ्या शहरांत, मोठ्या स्वप्नांच्या मागे! पण कधीतरी अशा चांदण्या रात्री गावच्या माडीवर पडून आकाशाकडे पाहिलं की उमगतं खरं सुख कुठे दूर नसतं. ते आपल्या बालपणीच्या आठवणींत, मातीच्या सुगंधात आणि त्या अथांग आकाशाखाली निःशब्दपणे आपली वाट पाहत असतं. ■■

---

# आरसा फोडून काय उपयोग?





संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०


एक अत्यंत कुरूप स्त्री होती. तिच्याकडे कोणी पाहिले तरी ती तशीच दिसायची. तिलाही आपण कुरूप आहोत याचा फार राग यायचा. तिच्या आसापास असणारी मंडळी तिला तिच्या कुरूपतेबद्दल काहीच म्हणत नसायचे मात्र ती आरशासमोर उभी राहिली की अत्यंत कुरूप दिसायची. तिला आरशाचा फार राग यायचा. तिने आरसा पाहिला की, तळपायाची आग मस्तकात जायची. त्यामुळे तिने अनेकदा अनेक आरसे फोडले आहेत. ती अनेकांना सांगायची, ''हे आरसे फार वाईट आहेत. मी नेहमीच माझा चेहरा त्यांच्यामध्ये पाहते तेव्हा माझा चेहरा नेहमीच कुरूपच दाखवतात. मला त्यांचा फार राग येतो.''

हे ऐकल्यावर अनेकांना धक्का बसायचा. आरसा जे आहे तेच दाखवणार. तो दुसरे तरी काय दाखवणार? आरसा जे खरे आहे तेच दाखवतो. त्यामुळे अशा रीतीने कितीही आरसे फोडले तरी चित्र बदलणार नाही. तिच्या या भावना ऐकल्यावर तिच्या नातेवाईकांनी तिला मानसोपचार तज्ज्ञांकडे उपचारासाठी नेले. तेव्हा त्या तज्ज्ञाने तिला विचारले की, ''तू आरसा का फोडतेस?'' तेव्हा ती म्हणाली, ''तसे नाही. मी सुंदर आहे पण या आरशांनी मला कुरूप बनवले आहे. हा जेव्हा माझ्या समोर नसतो तेव्हा मी सुंदर असते आणि हा समोर आला की मी कुरूप दिसते.''

खरं तर आरसा आणि कुरूप दिसणे याचा काय संबंध आहे? तुम्ही जसे असता तेच आरसा दाखवतो. त्यात आरशाचा काय दोष असतो? पण आपले वास्तव दाखवणारा आरसा आपल्याला नको असतो. हे ऐकल्यावर मानसोपचारतज्ज्ञांनी त्यांच्या परीने उपचार सुरू केले पण आपण देखील आपल्या जीवनात असाच आरसा दाखवणाऱ्या माणसांबद्दलचा व्यवहार करत असतो. आपल्या संबंधातही तसेच घडते कारण संबंध म्हणजे एक प्रकारचा आरसा आहे.

आपल्या संबंधात आपल्याला कोणी खरा आरसा दाखवला की, आपण संबंध तोडून टाकतो. सन्याशी जे असतात ते प्रपंचापासून दूर जातात. त्यांना प्रपंच, पत्नी नको असते कारण या सर्व गोष्टी म्हणजे मोह, माया, विनाशाला कारणीभूत असलेल्या गोष्टी आहेत असे मानत असतात. आपल्या धर्मातही तसाच विचार पेरलेला असतो. खरं तर एका अर्थाने या गोष्टी म्हणजे मोहाचा आरसा असतो. आपण त्या महिलेसारखे जीवन जगत असतो. ती महिला आरसा फोडत होती आणि आपण संबंध तोडून टाकत असतो. त्यामुळे आपण प्रपंचापासून, स्त्रीपासून पळून जाऊन काय उपयोग? कारण वासना, मोहाचा विचार तर आपल्यासोबत असतो. मुळात कुरूप आहोत म्हणून आरसा ती कुरूपता दाखवतो. त्याप्रमाणे आपल्या मनात वासना आहे, म्हणून ती मनात प्रतिबिंबीत होते पण ती मनातील वासना नष्ट करण्याऐवजी दुसऱ्यावर प्रत्योराप करत, तिचा त्याग केला आहे असे आपण समजतो. तेथील नातेसंबंध तोडतो.

उलट आपण जेव्हा जंगलात, हिमालयात जातो तेव्हा आपल्याला खूप छान वाटत असते कारण तेथे आरसा नाही. प्रपंचात आरसा आहे. तेथे तुम्ही कसे आहात ते प्रतिबिंबीत होत असते. आरसा फोडल्यावर जशी स्वतःची कुरूपता नष्ट होत नाही, त्याप्रमाणे आपण प्रपंच सोडला, हिमालयात गेलो म्हणजे मोह, वासना सुटते असं घडत नाही. त्यामुळे आपण हिमालयात गेलो आणि पुन्हा दोन-तीन तपानंतर परत आलो तरी तुमच्या सोबत वासना येतेच कारण तुम्हाला हिमालयात आरसा नव्हता. समाजात आला की, तुम्हाला तुमच्या आरशाचे दर्शन घडते. त्यामुळे ज्याला खरोखर सन्याशी व्हायचे आहे, तो हिमालयात पळून जात नाही. तो प्रपंचाचा त्याग करत नाही. समर्थांनी म्हटले आहे की, आधी प्रपंच करावा नेटका / मग घ्यावे ते परमार्थ विवेका कारण प्रपंचातच तुम्हाला तुमच्या खऱ्या चेहऱ्याचे दर्शन घडणार असते. खरा सन्याशी हा आपल्या जीवनातील आरशाकडे निरखून पाहत असतो. उलट तो आरशाला धन्यवाद देत असतो. याचे कारण तू माझे खरे रूप दाखवले, माझे मला वास्तवाचे दर्शन घडवले. खोटा सन्याशी अशा प्रकारे आरशाचा त्याग करत असतो. अशी त्याग करणारी माणसं समाजाला मोठी वाटत असतात पण ही खरी तर मोठी नाहीत कारण ते वास्तवापासून दूर पळून गेलेली असतात.

खरा सन्याशी हा नेहमी जागा असतो. पळून गेल्याने जागृतीचा भाव नाही. त्यातून लपण्याचा भाग आहे. कोणत्याही गोष्टींपासून पळून जाणे म्हणजे स्वतःला सुरक्षित करणे असे वाटेल पण ते काही खरे नाही. उलट प्रपंच किंवा अगदी संबंध माणसाला वास्तवाचे दर्शन घडवतात. आपण कोण आहोत? याची जाणीव करून देत असतात. त्यामुळे समाजातील हे आरसे आपल्याला जे काही दाखवतात, त्यापासून पळून जाण्याऐवजी आपण बदलणे हा महत्त्वाचा घटक आहे. आपण जेव्हा बदलू तेव्हा आपल्याला आरशाची मुळीच भीती वाटणार नाही. आपण आतूनच सुंदर झालो की, संबंधाचा आरसा आपल्याला आपली प्रतिमा अगदी स्वच्छ आणि सुंदरतेचे दर्शन घडवेल. कोणताही आरसा हा निस्वार्थ असतो. त्याला नको असलेला प्रतिमेचा भाव पुन्हा दाखवला तरी त्याला फायदा नाही. खोटी प्रतिमा दाखवून लाभ नाही, त्याप्रमाणे खरी प्रतिमा दाखवूनही फायदा नसतो. जे आहे ते दाखवण्याचे काम आरसा करत असतो. आपण आपल्या जीवनात आरशाच्या भीतीने पलायन करून जगण्याऐवजी आरशाला सोबत ठेवून मार्गक्रमण करणे हेच आपले कर्तव्य आहे. त्यातून आपल्यात सुधारणा होण्याची शक्यता आहे, म्हणून आरसा फोडू नका तर त्याला जपून ठेवायला हवे. ■■




रवींद्र कामठे
पुणे
९४२१२ १८५२८

पुस्तक परिचय

# हास्यरंग ज्यात मी जाहलो दंग

जगण्याचा दृष्टिकोन थोडासा विनोदी असेल ना तर आपल्या आसपास, आजूबाजूला इतकेच काय तर आपल्या घरातही घडणाऱ्या प्रसंगातून एक निखळ आनंद देणारा विनोद तयार होत असतो. फक्त आपल्याला तो थोडासा प्रयत्न करून शोधावा लागतो. आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात आजकाल आनंद म्हणा किंवा थोडासा विरंगुळा मिळाला ना की एक प्रकारची वेगळीच ऊर्जा आपल्यात निर्माण होते. मनावर आणि अर्थातच शरीरावर आलेला ताण एकदम नाहीसा होतो.




गेले काही दिवस तर आपल्या जगावर आणि अर्थातच आपल्या देशावर युद्धाचे ढग पसरलेले दिसत आहेत. २४ तास बातम्या सुद्धा तो सूर आळवत असतात. त्यातून जरा वेगळेपण शोधावेसे वाटले तर 'हास्यजत्रा' नावाची मालिका पाहून त्यातल्या त्यात थोडे बरे वाटते. राजकीय विश्लेषण तर पाहून वीट आलेला आहे. त्यात एखाद्या दुख:द घटनेला मीठ-मसाला लावून चर्चेची गुऱ्हाळे अखंडपणे चालू ठेवून टीआरपी वाढवण्याचा केविलवाणा प्रयत्न सर्व वृत्तवाहिन्या करताना पाहून स्वत:चीच कीव यायला लागते.

एकीकडे नकळत आपल्याला समाजमाध्यमांचा अगदी वीट आला आहे, त्याचे व्यसन जडले आहे असे म्हणत आपण फक्त अंघोळीच्या वेळेस मोबाईल बाथरूममध्ये नेत नाही हाच काय तो फरक आहे. (याला अपवाद असू शकतात). त्यातून हाती काय लागले तर उत्तर नाकारात्मकच येते. आपण या सगळ्याच्या इतके आहारी गेलो आहोत की, आपल्याला वाचनाची गोडी राहिलीच नाही का? असा विचार मनात येतो. मग त्यावर एकच उत्तर आपलेच मन आपल्याला द्यायला लागते, ते म्हणजे 'आजकाल चांगल्या दर्जाचे लेखन कुठे केले जाते?' तसे लेखकच नाही राहिलेत वगैरे वगैरे! हे म्हणजे 'नाचता येईना, अगणं वाकडे!'

या सगळ्यात मी नुकताच 'चपराक प्रकाशन'च्या कार्यालयात गेलो होतो आणि येताना नुकत्याच प्रकाशित झालेल्या २६ पुस्तकांचा खजिना घेऊन घरी आलो. तुम्हाला आश्चर्य वाटेल 'चपराक'ची सर्व पुस्तके मी नेहमीच अतिशय आवडीने आणि आवर्जून वाचतो; त्याचे कारण त्यामधील वैविध्यता आणि प्रगल्भता हे होय. आपण फक्त वाचत राहायचे. मी ह्या पुस्तकांमध्ये मनसोक्तपणे रमतो, भरपूर वाचतो आणि त्यामुळे मला नवीन विषय कळतात. नवीन तसेच प्रचलित लेखकांशी ओळख होते व लिहिण्यास बळ मिळते.

सांगायचं मुद्दा असा की, यात सुनील भातंब्रेकर यांचा 'हास्यरंग' हा अतिशय विनोदी आणि खेळकर शैलीतील लेखसंग्रह हातात पडला. आपल्या रोजच्या जीवनात घडणाऱ्या इटुकल्या पीटुकल्या प्रसंगाची अतिशय खोडकर पद्धतीने, बेमालूमपणे केलेली मांडणी माझ्या मनाला फारच भावली. माझ्या मनावरचा ताण एकदम नाहीसा होण्यास मदतच झाली. विनोदी लेखनाचा हा प्रकार जरा वेगळाच वाटला. लेखकाच्या या थोड्या वेगळ्या शैलीचे खूप कौतुक वाटले. या विनोदाला वैचारिक आणि सामाजिक बैठक मला अगदी प्रकर्षाने जाणवली. म्हणजे आपल्या बोलण्यात, चालण्यात, वागण्यात आणि ऐकण्यात सुद्धा या पुस्तकातील विनोद आणि खोडकर वृत्ती कित्येक वेळा आपल्याला जाणवत असते किंवा तसा विचार आपल्या मनात कधीतरी डोकावून गेलेला असतो परंतु आपण तो शब्दबद्ध करू शकत नाही. नेमकी हीच ती अनोखी शैली सुनील भातंब्रेकर यांनी त्यांच्या लेखणीतून वाचकांपर्यंत लीलया पोहोचवली आहे.

एकूण १० लेख असलेला हा संग्रह वाचताना मी तर काही काळ चक्क हरवून गेलो होतो. उदाहरणार्थ; 'ट्रॅफिक जॅम्मत' हा लेख. आपल्या रोजच्या आयुष्यात सामोरी जाण्याची समस्या लेखकाने ज्या खुबीने मांडली आहे ना की आता जर मी ट्रॅफिकमध्ये अडकलो तर मला भातंब्रेकरांचा लेखच डोळ्यासमोर येणार हे नक्की. 'अडलंय माझं' या लेखातही चप्पलसारख्या क्षुल्लक गोष्टीवर केलेला उच्च कोटीचा विनोद फारच भावला. 'फोटोबाचे अभंग' तर लेखकामधील कवीला दाद दिल्याशिवाय राहत नाहीत. '(वि)मानाचा प्रवास' तर अचाट आहे. 'व्यायाम महिमा' तर घरो घरी अगदी असाच पाहायला मिळतो पण असे लिहिण्याचे धाडस बहुधा कोणी केलेच नसेल. सुनील भातंब्रेकर यांची निरीक्षण करून त्यावर त्यांनी केलेली विनोदी टिप्पणी अतिशय खिलाडू वृत्तीने इतक्या अफलातूनपणे मांडली आहे की हा लेखसंग्रह जेव्हा जेव्हा मनावर ताण असेल ना तेव्हा तेव्हा वाचायला हवा. मनावरचा ताण तर नाहीसा होईलच पण आपल्यातील एक लहान, खोडकर वृत्तीचे मूल बाहेर पडून तुम्हाला प्रसन्न करेल याची मला खातरी आहे. हेच ह्या पुस्तकाचे यश आहे. सुंदर मुखपृष्ठ साकरल्याबद्दल ज्योती घनश्यामचे आणि अंतर्गत मांडणीसाठी संतोष खुटवड यांचे अभिनंदन. लेखक सुनील भातंब्रेकर यांचे मनापासून कौतुक.

**लेखक** : सुनील भातंब्रेकर
**प्रकाशक** : चपराक प्रकाशन
**पाने** : ९६
**मूल्य** : १७५

चपराक प्रकाशनची ग्रंथसूची

# शीतल किरणांची बरसात : चंद्रचाहूल



ज्योती मुळे-अंतुरे
पुणे
८१८०९३५७७७

पुस्तक परिचय

सातारा येथील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लेखिका मनीषा कुलकर्णी आष्टीकर यांचा नुकताच प्रकाशित झालेला ललित संग्रह म्हणजे चंद्रचाहूल. हा संग्रह 'चपराक प्रकाशन'कडून प्रकाशित झाला आहे. पुस्तकाला साजेसे मुखपृष्ठ ज्योती घनश्याम यांनी चितारलेले असून त्यातून स्त्रीच्या मन:पटलावरील चंद्राचे अस्तित्त्व रेखाटलेले आहे. लेखिकेने सदरील पुस्तक हे आपल्या आई-वडिलांना आणि लेखणीचे कौतुक करणाऱ्या त्यांच्या सासऱ्यांच्या पावन स्मृतिस अर्पण केले आहे.




'द्वेष, मत्सर सोडा राग अन् चांगुलपणानं सजवा मनाची बाग' अशी सरल शिकवण वाचकांना दिली आहे. फुलपाखरू जसे फुलांवर अलगद बसावे तसे लेखिकेने अनेक प्रसंगातून आपल्या मनाची भावविभोर स्थिती वाचकांसमोर मांडली आहे. अनेक प्रसंगातून लेखिकेची निसर्गाशी असणारी नाळ स्पष्ट दिसून येते. कधी कृष्णकमळ लावल्यानंतर त्याला फुल कसं लागत नाही? या विचाराने व्याकुळ होणारे मन तर कधी रोजच्या येण्या-जाण्याच्या वाटेवरील पारिजातक का सुकून जातोय? या विचाराने व्यथित होणारे मन लेखिकेच्या संवेदनशील मनाची ग्वाही देते. आपल्या अंगणात दोन वेळा चमेली लावूनही ती काही न काही कारणाने टिकली नाही तर तिची जागा पांढऱ्या चाफ्याने भरून काढणारी लेखिका जणू काही हातात नसलेल्या गोष्टीसाठी रडत बसण्यापेक्षा हातात असणाऱ्या गोष्टी आवडीने पूर्ण करण्याचा संदेश देते.

'राधा तो राधा, राधा बिना कृष्ण आधा' असे म्हणत राधेच्या जीवनातील श्रीकृष्णाचे अतूट असलेले स्थान लेखिका आपल्या लेखणीतून आविष्कृत करते. शाळेतील विद्यार्थ्यांना कधी ती राधा होण्यासाठी काय लागतं? याचा अर्थ समजावते तर कधी खरे प्रेम म्हणजे काय? हे व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने सांगताना दिसते. रुक्मिणी आणि सत्यभामा यांच्या संवादातून राधेचे जिवंत रूप लेखिका साकार करते. समोरच्याचे दुःख आपण वाटून घेणे म्हणजे प्रेम असा मोलाचा संदेश आज प्रेमात अर्थहीन, दिशाहीन जीवन भरकटलेल्या पिढीला लेखिका करून देते. आज कालबाह्य झालेल्या पण पूर्वी जीवनाचा अविभाज्य असणाऱ्या पत्रांची स्मृती आईचे पत्र हरवले यातून ती करून देते. कधी भुलाबाईची आठवण काढून पूर्वापार चालत आलेल्या परंपरांची जाणीव करून देत असताना, आपला पूर्वीचा सकस आहार आणि आताची फास्ट फूड संस्कृती यातील तफावत दाखवून देते. कधी आईने भेट दिलेल्या साडीची अनमोल किंमत तर कधी सासू सुनेच्या नात्यांची हळुवार गंमत लेखिकेच्या हळव्या स्त्री मनाची साक्ष देते. आनंद वाटणारी आनंदी यातून सहजपणे जीवनाचे तत्त्वज्ञान सापडते. कधी विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर झालेली जनाई, कधी कृष्णभेटीसाठी व्याकूळ राधा तर कधी सागराकडे धाव घेणारी नदी या लेखातून ओसंडून वाहते.

**माझ्या माहेरची गोदा**
**सदा वाहे खळखळ**
**तिचं निळसर पाणी**
**देई जगण्याला बळ**

नदी या लेखातून तिच्याप्रमाणे मन प्रवाही, स्वच्छ, निर्मळ व्हावे ही उदात्त भावना व्यक्त केलीय. नदीच्या कविता, नदीची गाणी यातून नदीवरील अनेक कवितांना, गीतांना उजाळा दिलाय. लेखिकेला चंद्र कधी मामा, भाऊ, सखा तर कधी प्रियकर अशा वेगवेगळ्या रूपात येऊन भेटतो.

लेखिका आपला चंद्राविषयी असणारा भाव सांगताना म्हणते की, जसे पावसापासून संरक्षण करणारा रेनकोट त्याप्रमाणे जीवनातील कठीण प्रसंगावर हळुवार शीतलतेचे पांघरून घालणारा मुनकोट. तिचे अवघे जीवनच कधी निसर्गमय, नदीमय, कृष्णमय, चंद्रमय भासते. स्त्रिच्या समर्पित वृत्तीचे सकल दर्शन 'चंद्रचाहूल' या पुस्तकातून दिसून येते. ज्याप्रमाणे चकोराचे जीवन चंद्रकिरण प्राशून तृप्त होते असे म्हणतात त्याप्रमाणे वाचकाची तहान चंद्रचाहूलच्या पानापानांतून शमेल हा विश्वास. तेव्हा हे पुस्तक सर्वांनी वाचा आणि संग्रही ठेवा.

**लेखिका** : मनीषा कुलकर्णी-आष्टीकर
**प्रकाशन** : चपराक प्रकाशन
**पाने** : १४४, मूल्य : २५० /-

# वृद्धाश्रमातील पालक



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त
लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

सकाळचे कोवळे ऊन हळूहळू अंगणात उतरू लागले होते. वृद्धाश्रमाच्या जुन्या, फिकट भिंतींवर ते ऊन जणू काही हलकेसे हसू उमटवत होते. अंगणातल्या मोगऱ्याच्या झाडावरून मंद सुगंध दरवळत होता पण त्या सुगंधातही एक उदास शांतता मिसळलेली होती. त्या अंगणातल्या लाकडी बाकावर शांतपणे बसले होते शंकरराव. त्यांच्या हातात जुन्या आठवणींनी भरलेली एक डायरी होती पण आज ते काही लिहीत नव्हते. ते फक्त पानं उलटत होते. जणू काही काळ मागे फिरवण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या बाजूलाच बसली होती सरस्वतीबाई, त्यांची जीवनसाथी. दोघांचेही केस पांढरे झाले होते, चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या पण डोळ्यांत अजूनही एकच प्रश्न होता, आपण इथे का आहोत?

कधीकाळी हे दोघे एका गजबजलेल्या घराचे आधारस्तंभ होते. त्यांच्या छोट्याशा घरात हसण्याचे, बोलण्याचे, खेळण्याचे आवाज सतत घुमत असत. त्यांचा मुलगा अमोल घरभर पळत असे. कधी आईच्या पदराला धरून उभा राहत असे तर कधी वडिलांच्या खांद्यावर बसून जग पाहत असे. शंकररावांनी आयुष्यभर मेहनत केली. लहानशा सरकारी नोकरीतून त्यांनी आपल्या मुलाला चांगले शिक्षण दिले. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून त्यांनी अमोलच्या स्वप्नांना पंख दिले. सरस्वतीबाईनेही संसारासाठी खूप त्याग केला. स्वतःचे आजार, थकवा, सगळं लपवून त्या घर सांभाळत राहिल्या. अमोलचा अभ्यास, त्याचे खाणे-पिणे, त्याचे मित्र, त्याचे भविष्य हाच त्यांचा श्वास होता.

काळ पुढे सरकत गेला. अमोल मोठा झाला, शिकला, परदेशात नोकरी मिळवली. घरात आनंदाची लाट उसळली. शंकररावांनी सगळ्यांना अभिमानाने सांगितले, 'माझा मुलगा मोठा अधिकारी झाला!' लग्न झाले. सुनेचे स्वागत घरात झाले. काही दिवस सगळं छान होतं पण हळूहळू घरातल्या हसण्याचा आवाज कमी होऊ लागला. सुरुवातीला छोट्या छोट्या गोष्टींवरून वाद होऊ लागले. सरस्वतीबाईंच्या जुन्या सवयी सुनेला खटकू लागल्या. शंकररावांचे सल्ले अनावश्यक वाटू लागले. ''बाबा, आता काळ बदलला आहे,'' अमोल म्हणायचा. ''आई, तुम्ही इतकी काळजी करू नका,'' तो हसून सांगायचा पण त्या शब्दांमध्ये एक दुरावा होता.

एके दिवशी अमोलने शांतपणे सांगितले, ''बाबा, आई आम्ही दोघेही नोकरीत खूप व्यग्र असतो. तुमच्यासाठी एक चांगली व्यवस्था केली आहे. तिथे तुमची योग्य काळजी घेतली जाईल.'' त्या 'व्यवस्थे'चे नाव होते वृद्धाश्रम. त्या दिवशी सरस्वतीबाईंच्या हातातून पाण्याचा ग्लास निसटून पडला होता. शंकरराव काही बोलले नाहीत. त्यांनी फक्त मुलाकडे पाहिले, ज्या मुलासाठी त्यांनी आयुष्य घालवले होते. आज ते दोघे त्या वृद्धाश्रमात होते. तिथे सगळ्यांचीच कहाणी जवळजवळ सारखी होती. कुणाला मुलाने सोडले होते, कुणाला मुलीने. कुणाला स्वतःच्या घरात जागा नव्हती तर कुणाला वेळ नव्हता. दुपारच्या जेवणानंतर सरस्वतीबाई नेहमीप्रमाणे खिडकीत उभ्या राहत. त्या रस्त्याकडे पाहत राहायच्या. ''आज येईल का अमोल?'' त्या हलक्या आवाजात विचारायच्या. शंकरराव नेहमीप्रमाणे हसत म्हणायचे, ''हो! कधीतरी येईल!'' पण त्या 'कधीतरी'चा दिवस अजून आला नव्हता.

एके दिवशी वृद्धाश्रमात छोटा कार्यक्रम आयोजित केला होता. काही शाळकरी मुलं भेटायला आली होती. त्यांनी गाणी म्हटली, कविता सादर केल्या. त्यातल्या एका लहान मुलाने आईवर कविता म्हटली. सरस्वतीबाईंचे डोळे भरून आले. त्यांच्या मनात आठवणींचा पूर आला. अमोल लहान असताना 'आई' म्हणत त्यांना मिठी मारायचा. कार्यक्रमानंतर ती मुलं वृद्धांशी बोलत होती. एक मुलगा शंकररावांजवळ आला आणि म्हणाला, ''आजोबा, तुमचा मुलगा कुठे आहे?''

क्षणभर शंकरराव गप्प राहिले. मग हसून म्हणाले, ''तो खूप मोठा झाला आहे. खूप दूर राहतो.''

त्या मुलाने सहज विचारले, ''तो तुम्हाला भेटायला येतो का?''

शंकररावांच्या डोळ्यांत पाणी आले पण त्यांनी ते लपवले. ''तो येईल'' त्यांनी फक्त एवढेच म्हटले. त्या रात्री सरस्वतीबाई झोपल्या नव्हत्या. ''आपण काही चूक केली का?'' त्यांनी विचारले. शंकरराव शांत होते. ''आपण त्याला खूप प्रेम दिलं म्हणूनच का तो आपल्यापासून दूर गेला?''

त्या प्रश्नाचे उत्तर शंकररावांकडे नव्हते. फक्त शांतता होती.

काही महिन्यांनी वृद्धाश्रमात फोन आला. अमोलचा होता. तो म्हणाला, ''बाबा मला तुमची आठवण येते.''

शंकररावांच्या आवाजात कंप होता. ''आम्हालाही येते, बाळा!''

त्या दिवशी पहिल्यांदाच सरस्वतीबाईंच्या चेहऱ्यावर हलकंसं हसू उमटलं. काही दिवसांनी अमोल वृद्धाश्रमात आला. त्याने आई-वडिलांसमोर येऊन मान खाली घातली. ''माफ करा. मी चुकीचा होतो.''

सरस्वतीबाईंचे डोळे भरून आले. त्यांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला. पालक मुलांना कधी दोष देत नाहीत. त्या क्षणी वेळ जणू थांबली होती. वृद्धाश्रमाच्या अंगणात पुन्हा एकदा हसण्याचा आवाज घुमला; पण त्या हसण्यात एक खोल सत्य दडलेले होते. पालक कधीच वृद्ध होत नाहीत. ते फक्त वाट पाहत राहतात. त्यांच्या प्रेमाची, त्यांच्या मुलांची आणि त्या एका क्षणाची ज्या क्षणी कोणी तरी पुन्हा 'आई' किंवा 'बाबा' म्हणून हाक मारेल.

# नका सर, राहू द्या!



भरत
विठ्ठल पाटील
नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

''नका सर, राहू द्या!'' दुसरीतल्या भूमीच्या तोंडून आलेला हा साधा शब्द माझ्या शिक्षक जीवनातला मोठा धडा ठरला. प्रसंग वेगवेगळे, परिस्थिती वेगळी; पण तिची भूमिका मात्र सारखीच, स्वतःपेक्षा दुसऱ्याचा विचार करणारी!

भारतीय प्रजासत्ताक दिनाची तयारी शाळेत सुरू होती. मुलींच्या लेझीम पथकाचा सराव रंगात आला होता. प्रत्येक मुलगी आपल्या हातातील लेझीम तालावर वाजवत होती. उत्साह, आनंद आणि थोडीशी स्पर्धा वातावरण अगदी भारलेले होते. त्याच वेळी भूमीच्या वाट्याला एक तुटकी लेझीम आली होती. सराव करताना ती तुटली. ती वाजवताना तिच्या चेहऱ्यावर थोडंसं संकोचाचं सावट दिसलं. मी ते लक्षात घेतलं आणि तिच्याकडील लेझीम बदलून देतो असं सांगितलं.

ती शांतपणे म्हणाली, ''नका सर, राहू द्या.''

मी आग्रह केला, तर ती सहज बोलली, ''सर, मग ही तुटकी दुसरीला जाईल ना? नका हो, राहू द्या.''

क्षणभर मी निःशब्द झालो. एवढ्याशा मुलीच्या मनात स्वतःपेक्षा दुसऱ्याचा विचार इतक्या सहजपणे उमललेला पाहून मन भरून आलं. तिला चांगली लेझीम हवी नव्हती असं नाही; पण तिच्या बदल्यात दुसऱ्याच्या वाट्याला तुटकी जाऊ नये, ही जाणीव तिच्या मनात मोठी होती. काही दिवसांनी आणखी एक प्रसंग घडला. सर्व मुलांना नवीन वह्या वाटल्या जात होत्या. प्रत्येक जण उत्साहाने आपली वही घेत होता. चाचपून पाहत होता. योगायोगाने भूमीच्या वाट्याला एक थोडी पान फाटलेली वही आली. ते लक्षात येताच मी ती बाजूला काढून दुसरी देण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात ती म्हणाली, ''ओ सर, नंतर ही वही कोणाला तरी जाईल ना? मग राहू द्या, मीच वापरून घेते.''

यावेळी मी आतून हललो. अंगात एक रोमांच उभा राहिला. अंगाला काटा आला. धाडकन लेझीमचा प्रसंग डोळ्यासमोर आला होता. यावेळीही तिच्या आवाजात कोणतीही खंत नव्हती, राग नव्हता; उलट समाधान होतं. स्वतः थोडं कमी पडलं तरी चालेल पण दुसऱ्याला कमी पडू नये ही भावना तिच्या मनात स्पष्ट होती.

या दोन प्रसंगांतून मला जाणवलं, की शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हे. जीवनकौशल्यांची बीजं रुजवणं हे त्याहून अधिक महत्त्वाचं आहे. भूमीमध्ये दिसलेली संवेदनशीलता म्हणजे दुसऱ्याच्या भावनांची जाणीव ठेवणं. तिच्यातील जबाबदारीची भावना म्हणजे परिस्थिती स्वीकारून सकारात्मक निर्णय घेणं. एवढ्या लहान वयात ही जाणीव निर्माण होणं म्हणजे घर आणि शाळा या दोन्ही ठिकाणी झालेल्या मूल्यसंस्कारांची पेरणीच म्हणावी लागेल.

या दोन्ही प्रसंगांकडे पाहताना भूमीच्या वागण्यात आणखी एक महत्त्वाचा गुण प्रकर्षाने जाणवला तो म्हणजे तिच्यातील सौजन्यशीलता. सौजन्य म्हणजे सौहार्देन जन्यते इति, म्हणजे केवळ नम्र शब्द वापरणे नव्हे; तर इतरांच्या भावनांचा आदर राखत, कुणालाही दुखावणार नाही अशा पद्धतीने वागणे. भूमीने ''नका सर, राहू द्या'' असे म्हणताना स्वतःची इच्छा दडपली पण त्यात कुठेही हट्ट, तक्रार किंवा नाराजी नव्हती. उलट तिच्या बोलण्यात सभ्यपणा, समजूतदारपणा आणि इतरांविषयी आदरभाव होता. सौजन्यशीलता मुलांना समाजात सुसंवाद साधायला शिकवते. ती स्पर्धेपेक्षा सहकार्याची, स्वार्थापेक्षा समतेची आणि अधिकारापेक्षा कर्तव्याची जाणीव निर्माण करते. अशा मूल्यांमुळेच व्यक्तिमत्त्व आकर्षक आणि विश्वासार्ह बनते. भूमीसारख्या विद्यार्थिनींच्या वर्तनातून दिसणारी सौजन्यशीलता हीच खरी शाळेच्या संस्कारांची कमाई आहे. आजच्या युगात 'मला चांगलं मिळालं पाहिजे' हा विचार सहज रुजतो पण 'माझ्यामुळे दुसऱ्याला वाईट मिळू नये' हा विचार रुजवणं हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे. संसाधनांचा आदर, समतेची जाणीव आणि इतरांविषयी करुणा, दया हीच समाजाला उन्नत करणारी मूल्ये आहेत. भूमीचा 'नका सर राहू द्या' हा शब्द मला प्रत्येक वेळी आठवतो आणि शिकवतो की शाळा म्हणजे फक्त ज्ञान देणारी संस्था नाही; ती माणुसकी घडवणारी कार्यशाळा आहे. अशा निरागस प्रसंगांमुळेच आपल्यातला शिक्षक पालक म्हणून आपलं माणूसपण जगत असतो. चिमुकले नवा विचार नेहमीच रुजवत असतात. जरी इथे दररोज पुस्तकांबरोबरच माणुसकीचीही अक्षरं शिकवली जात असली तरी कधी कधी विद्यार्थ्यांकडूनच ती शिकायलाही मिळतात हे विशेष असतं.



# महिला, अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक

## मेधा कुलकर्णी यांच्याकडून संसदेत मुद्दा उपस्थित; मानवी तस्करी रोखण्याची मागणी

**पुणे (प्रतिनिधी)** : राज्यात महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक असून, याबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत केली. झीरो अवरमध्ये वाढत्या मानवी तस्करीबाबत मेधा कुलकर्णी यांनी प्रश्न उपस्थित करीत या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे नमूद केले. सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, जेणेकरून महिला व अल्पवयीन मुलींची सुरक्षितता सुनिश्चित होईल, असे त्यांनी म्हटले.



डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''या समस्येचे स्वरूप अत्यंत चिंताजनक असून, गृह विभागाच्या आकडेवारीनुसार २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांत तब्बल ९३ हजार ९४० महिला व मुली बेपत्ता झाल्या आहेत. यापैकी २३ हजारांहून अधिक अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. दररोज सरासरी १३२ महिला बेपत्ता होत असल्याचे आढळले आहे. मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई यांसह पुण्यातही अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. पुण्यातच गेल्या १५ दिवसांत १३ ते १७ वयोगटातील २० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणांमध्ये मानवी तस्करीच्या संघटित जाळ्यांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. जबरदस्तीने पळवून नेणे, खोट्या प्रेमसंबंधांच्या माध्यमातून फसवणूक, तसेच सोशल मीडियाचा गैरवापर यासारख्या बाबीही पुढे येत असल्याचे निरीक्षण गृहविभागाने नोंदवले आहे.''

तपास आणि शोधकार्याचा वेग अत्यंत कमी असल्याचे सांगून प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, ''२०२४ मधील ४५ हजार प्रकरणांपैकी १५ हजार प्रकरणांमध्ये अद्याप कोणताही ठोस मागोवा लागलेला नाही. २०२५ मधील ४८ हजार प्रकरणांपैकी १३ हजार महिला अद्याप सापडलेल्या नाहीत. म्हणजेच गेल्या दोन वर्षांत सुमारे २८ हजार महिला व मुलींचा अद्याप शोध लागलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बेपत्ता झालेल्या महिलांचे भवितव्य काय?, त्यांची तस्करी झाली का?, त्यांना परदेशात विकले गेले का? किंवा त्यांच्यावर अत्याचार झाला का?'' असे गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केले. या समस्येवर उपाय म्हणून काही ठोस मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये 'गोल्डन अवर्स'मध्ये त्वरित शोध घेण्यासाठी आधुनिक व जलद तपास यंत्रणा उभारणे, मोबाईल ट्रॅकिंग प्रणाली अधिक सक्षम करणे, सार्वजनिक ठिकाणी कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे व त्यांचे सतत निरीक्षण करणे यांचा समावेश आहे. तसेच जबरदस्ती धर्मांतर आणि विवाहाच्या प्रकरणांवर कठोर कारवाई, अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण तसेच प्रवास आणि हॉटेलमध्ये ओळखपत्र अनिवार्य करण्याची मागणी त्यांनी केली.

राज्यातील टोल नाक्यांवर डिजिटल पेमेंट व ओळख प्रणाली अधिक सक्षम करण्याचीही आवश्यकता असल्याचे त्या म्हणाल्या.



# बलिदानाची परंपरा विसरू नका : सिन्हा

**प्राधिकरण (प्रतिनिधी)** : ''स्वातंत्र्यपूर्व काळातील संकटं, समस्या वेगळ्या होत्या. आजच्या समस्या आणि संकटं वेगळी आहेत; परंतु या दोन्ही कालखंडात वेगळेपणा असला तरी राष्ट्रप्रेम, कर्तव्य आणि जबाबदारी यात आजही बदल नाहीच. आज आपल्या सर्वांपुढे पाणी टंचाई, प्रदूषण, वाढते शहरीकरण, बेरोजगारी, भूक आणि इतर अनेक आव्हाने आहेत, ज्यांचा सामना करण्यासाठी आजचा तरुण जागरूक, सक्षम आणि कृतिशील असला पाहिजे आणि त्यासाठी त्याला भारतातील बलिदान परंपरा माहीत असली पाहिजेच. शिवाय वर्तमान कायदे व नियमांचेही ज्ञान असले पाहिजे, असे मत ज्येष्ठ सामाजिक, पर्यावरण कार्यकर्ते रवींद्र सिन्हा यांनी व्यक्त केले.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदान दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी संत ज्ञानेश्वर उद्यान, रावेत प्राधिकरण येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या क्रांतिकारकांना आदरांजली वाहण्यासाठी रावेत प्राधिकरण येथे दरवर्षीप्रमाणे मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमासाठी परिसरातील रावेत प्राधिकरण नागरिक समिती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय ग्राहक मंच तसेच परिसरातील हौसिंग सोसायटींचे सदस्य आणि अन्य सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, महाविद्यालयीन तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यावेळी मोरेश्वर भोंडवे, चंद्रकांत सावंत, तृप्ती राठोड, हर्षल भारंबे, धीरज ठाकूर आदींच्या हस्ते हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

उपस्थितांनी वीर राजगुरू यांच्या बलिदानाचे स्मरण करताना क्रांतिकारकांच्या शौर्यगाथांचा उल्लेख करत तरुणांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहनही केले. यावेळी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण तसेच विविध भाषणे झाली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांकडून सर्वानुमते आपले सामाजिक कर्तव्य ओळखून देशसेवेसाठी तत्पर राहण्याचा संकल्प केला गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपेंद्रदादा धोंडे यांनी केले तर धीरज ठाकूर यांनी गीत सादरीकरण केले. यावेळी महान बलिदानी क्रांतिकारकांच्या सन्मानार्थ घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



**रमा जाधव**
कोल्हापूर
८००७९९७२२३

**'बैयाँ ना धरो ओ बलमा' ही रचना ऐकताना प्रथमक्षणीच तिच्या लयीने आणि पुनरुक्तीने मनात ठसा उमटतो. हा ठसा केवळ श्रवणसौंदर्यापुरता मर्यादित राहत नाही तर हळूहळू स्त्री मनाच्या आतल्या भावविश्वात नेऊन सोडतो. प्रेम, आकर्षण, लाज, आर्तता आणि स्वाभिमान यांचा अतिशय नाजूक गुंता या गीतात उलगडत जातो. म्हणूनच ही रचना फक्त एक लोकगीत किंवा ठुमरी राहत नाही; ती स्त्रीच्या आत्मभानाची सूक्ष्म अभिव्यक्ती बनते.**

# बैंया ना धरो

गीताच्या केंद्रस्थानी आहे तो एक स्पष्ट पण संयत नकार 'बैयाँ ना धरो ओ बलमा'. हा नकार प्रेम नाकारणारा नाही तर अधिकार गाजवणाऱ्या स्पर्शाला घातलेली मर्यादा आहे. प्रिय व्यक्ती जवळची आहे, तिच्याविषयी ओढ आहे पण त्या ओढीत स्वतःचे अस्तित्व विरघळून जाऊ नये, ही काळजी या ओळींतून व्यक्त होते. म्हणूनच हा नकार कठोर नाही; तो कोमल आहे पण ठाम आहे. जणू प्रेमातही स्वतःची जागा राखून ठेवण्याचा तो आग्रह आहे.

चुनरी, चूड्या, झनकार अशा प्रतिमांमधून स्त्रीचे सौंदर्य उलगडत जाते. ती सजलेली आहे, तिच्या हालचालींनी झंकार उठते, वातावरण भारावून जाते पण हे सारे अलंकार केवळ बाह्य शोभेपुरते नाहीत. त्यामागे एक जाणीव आहे. मी सुंदर आहे, मोहक आहे पण त्यामुळे कुणालाही माझ्यावर हक्क मिळत नाही. सौंदर्य आणि स्वातंत्र्य यांची ही सांगड या गीतात फार सहजपणे व्यक्त होते. 'मोहे छोडो हाय सजना' या ओळीतली आर्तता क्षणिक दुर्बलतेसारखी वाटली तरी लगेचच 'दीया सीस उठाए सजना' या ओळीतून आत्मसन्मान डोकावतो. ती डोळ्यांत डोळे घालून पाहते, नजरेचा सामना करते. इथे लाज आहे पण लाचारी नाही. प्रेमात बुडून जाण्याऐवजी स्वतःला सावरून उभे राहण्याची ही वृत्ती गीताला वेगळी उंची देते. 'मैं तो आप बहकी, चलूँ जैसे महकी, चमेलिया की डार' या प्रतिमेतून स्त्रीचे नाजूक, सुगंधी अस्तित्त्व समोर येते. ती बहकते, तिच्या हालचालींना गंध आहे पण तरीही ती स्वतंत्र आहे. चामेल्याच्या फांदीसारखी हलणारी, सुगंध पसरवणारी पण मुळांशी घट्ट जोडलेली. ही उपमा स्त्रीच्या भावविश्वाचे सुंदर रूपक बनते. रसदृष्ट्या पाहता या गीतात शृंगाररस प्रधान असला तरी तो केवळ देहकेंद्रित नाही. त्यात स्वाभिमानाचा, आत्मभानाचा सूक्ष्म पदर आहे. त्यामुळे हा शृंगार परिपक्व वाटतो.

प्रेमात सन्मान हवा, ओढीत समजूत हवी आणि जवळकीत स्वेच्छा हवी ही मूल्ये या रचनेतून सहजपणे व्यक्त होतात. एकूणच 'बैयाँ ना धरो ओ बलमा' हे गीत स्त्रीच्या सौंदर्याचे, भावनांचे आणि स्वातंत्र्याचे संतुलित दर्शन घडवते. प्रेम नाकारणे हा त्याचा हेतू नाही; प्रेमाला मर्यादा, सन्मान आणि संवेदनशीलतेची चौकट देणे हा त्याचा गाभा आहे. म्हणूनच ही रचना काळाच्या पलीकडे जाऊन आजही तितकीच अर्थपूर्ण वाटते कारण ती प्रेमाबरोबरच स्वतःची ओळख जपण्याची आठवण करून देते.

# कलाकारांनी अनुभव आणि वास्तवातून प्रेरणा घ्यावी : पाटील

## गौरीशंकर महाविद्यालयाचे कला प्रदर्शन उत्साहात

**सातारा, (प्रतिनिधी)** : गौरीशंकर एज्युकेशन सोसायटी संचलित कला महाविद्यालयाचे २९ वे वार्षिक कला प्रदर्शन दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या सहकार्याने दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल येथे २०, २१ आणि २२ मार्च २०२६ रोजी संपन्न झाले. २२ मार्च रोजी दुपारी बक्षीस वितरण व निरोप समारंभ पार पडला. या कार्यक्रमास लेखक, संपादक, पत्रकार आणि 'चपराक प्रकाशन'चे प्रमुख घनश्याम पाटील, प्रसिद्ध लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, कलाशिक्षक प्रा. सत्यजित वरेकर, प्राचार्य विजयकुमार धुमाळ, श्रीरंग काटेकर, रंगराव जाधव, शिरीष चिटणीस यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

घनश्याम पाटील यांनी कला आणि जीवन यांच्यातील घट्ट नातेसंबंध अधोरेखित करत कलाकाराने आपल्या अनुभवांमधून आणि आसपासच्या वास्तवातून प्रेरणा घ्यावी, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्यावर न थांबता विचारसंपन्न आणि अर्थपूर्ण कलाकृती निर्माण करण्याचा सल्ला दिला. सतत प्रयोगशील राहणे आणि नवीन माध्यमांचा शोध घेणे हे कलाकारासाठी आवश्यक असल्याचे नमूद केले. कला प्रदर्शन हे केवळ प्रदर्शन नसून शिकण्याची आणि स्वतःला अधिक विकसित करण्याची संधी आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



संदीप वाकचौरे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गौरव करत कलाक्षेत्रात आत्मविश्वास आणि सातत्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक कलाकृती ही कलाकाराच्या विचारांची आणि भावनांची ओळख असते. त्यामुळे प्रामाणिकपणे आणि मनापासून काम करणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव आणि शिस्त यांचा अंगीकार करण्याचा सल्ला दिला. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आणि माध्यमांचा स्वीकार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कला प्रदर्शनासारख्या संधी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात, असे सांगत त्यांनी सर्वांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिरीष चिटणीस यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून कला शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी स्पष्ट केले की कला ही केवळ कौशल्य नसून व्यक्तिमत्त्व विकासाची एक प्रभावी प्रक्रिया आहे. सातत्यपूर्ण सराव, सूक्ष्म निरीक्षण आणि सर्जनशीलतेला प्राधान्य देणे हे यशस्वी कलाकाराचे गुण असल्याचे त्यांनी नमूद केले. कला प्रदर्शन हे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढवण्याचे आणि आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे योगदान यामुळे विद्यार्थ्यांचा दर्जा उंचावतो, असे सांगत त्यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

श्रीरंग काटेकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे विशेष कौतुक करत कला क्षेत्रात सातत्य आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगळी कल्पकता आणि दृष्टीकोन असतो. कला ही केवळ अभिव्यक्ती नसून समाजाशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. प्रदर्शनासारख्या व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःची कला सादर करण्याची संधी मिळते आणि त्यातून आत्मविश्वास वाढतो.

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. सुनीता कांजिले, निखिल जाधव, कुणाल माने, ओम नारकर, सिद्धी देवरुखकर या विद्यार्थ्यांना पुरस्कार मिळाले. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अधिक चांगले व नावीन्यपूर्ण कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनीता कांजिले व अंजली ननावरे यांनी केले.

## महाराष्ट्र नागवा झाला!

◀◀ पान १ वरून

आणि त्यातून असे कांड घडतात. नापिकी, भूकंप, त्सूनामी, महापूर या आणि अशा नैसर्गिक संकटांमुळे जे दुःख वाट्याला येते त्यापेक्षा कितीतरी पट दुःख अशा प्रकरणांमुळे सहन करावे लागते. आपली कुणी आर्थिक फसवणूक केली तर ती भरून काढता येते पण आपली भावनिक फसवणूक झाली तर त्या वेदना चिरकाल टिकतात. आज एक अशोक खरात सापडलाय. समाजात असे किती तरी खरात जागोजागी असतील. त्यांच्या नादी लागून आपण फक्त आपलेच नुकसान करून घेत नाही तर इथल्या मातीचा आदर्श इतिहासही आपल्याच हाताने पुसून टाकतोय. त्याचे पापक्षालन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही.

शिष्यत्व स्वीकारण्यापूर्वी आपल्या गुरूंचीही परीक्षा घेणाऱ्या युगपुरुष स्वामी विवेकानंदांचे आपण उदाहरण सांगतो. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांचा चौरंगा करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतो आणि दुसरीकडे अशोक खरातसारख्या भोंदूंच्या फसवणुकीला बळी पडतो. त्याला पाठिशी घालणाऱ्या राजकारण्यांना मोठ्या मनाने स्वीकारतो. ही आपण स्वतःचीच केलेली प्रतारणा आहे. या सगळ्यांपासून आपल्याला जाणीवपूर्वक दूर राहता आले पाहिजे. ते जमले तर आणि तरच उद्याची पिढी आपल्याला माफ करू शकेल. अन्यथा एका मोठ्या अरिष्टांपासून आपल्याला कोणीही वाचवू शकणार नाही.

# कलम ६६अ चा वापर बेकायदेशीर

◀◀ पान १ वरून

**२. मँडामस**

मँडामस याचा अर्थ 'आदेश देतो' असा होतो.

जेव्हा एखादा सरकारी अधिकारी किंवा संस्था आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडत नसेल तर त्यांनी त्यांचे कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यास भाग पाडण्यासाठी न्यायालयाकडून मँडामस अंतर्गत आदेश दिला जातो.

महत्त्वाचे : मँडामस रिट खासगी व्यक्तिविरुद्ध लागू होत नाही.

**३. प्रोहिबिशन**

प्रोहिबिशनचा अर्थ 'थांबा किंवा प्रतिबंध' असा होतो.

एखादे न्यायालय किंवा न्यायाधिकरणाने आपले अधिकार क्षेत्र ओलांडल्यास त्यांना थांबविण्यासाठी उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडून प्रोहिबिशन रिट अंतर्गत आदेश दिला जातो.

**४. सर्टिओरारी**

सर्टिओरारीचा अर्थ 'माहिती मिळवणे / आदेश रद्द करणे' असा होतो.

एखाद्या न्यायाधिकरणाने किंवा कोणत्याही सरकारी यंत्रणेने आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्यास किंवा न्यायनियमांचे उल्लंघन केल्यास त्यांचा आदेश रद्द (क्वॉश) करण्यासाठी उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडून सर्टिओरारी रिट अंतर्गत आदेश दिला जातो.

**५. क्वो वॉरंटो**

क्वो वॉरंटोचा अर्थ 'आपण हे कोणत्या अधिकाराने करीत आहात?' हे विचारणे आहे.

अनेकदा सरकारी अधिकारी किंवा सरकारी संस्था आपले अधिकारक्षेत्र नसताना अधिकार क्षेत्राच्या बाहेर जावून कारवाई करतात. तेव्हा त्या कारवाईस थांबविण्यासाठी आणि केलेल्या कारवाईस जाब विचारण्यासाठी न्यायालयाकडून क्वो वॉरंटो रिट अंतर्गत आदेश दिला जातो.

**भारतीय राज्य घटनेचा अनुच्छेद १३ (आर्टिकल १३)**

भारतीय राज्यघटना ही देशातील सर्वोच्च कायदा असून, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या अधिकारांचे प्रभावी रक्षण व्हावे यासाठी राज्यघटनेत काही महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यापैकी अनुच्छेद १३ हे अत्यंत मूलभूत आणि निर्णायक कलम मानले जाते. हे कलम असे सुनिश्चित करते की, कोणताही कायदा नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात जाऊ शकत नाही.

भारतीय राज्यघटनेच्या भाग ३ मध्ये दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात असलेला कोणताही कायदा ह्या अनुच्छेदाअंतर्गत अवैध (घटनाविरोधी) ठरेल. म्हणजेच, जर एखादा कायदा नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत असेल तर तो कायदा न्यायालयाद्वारे रद्द केला जाऊ शकतो.

आजच्या डिजिटल युगात नागरिकांकडे सामाजिक माध्यमांवर आपली मते मांडण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत केवळ राजकीय किंवा वैयक्तिक मत व्यक्त केल्यामुळे अटकेची भीती निर्माण होणे किंवा कायदेशीर कारवाईची धमकी दिली जाणे हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणारे आहे. तरीही आजही काही ठिकाणी तपास यंत्रणांकडून कलम ६६अ अंतर्गत गुन्हे दाखल केल्याच्या घटना समोर येतात. कायद्याचे अपुरे ज्ञान असल्यामुळे अनेक नागरिक अशा कारवाईचे बळी ठरतात, ही चिंताजनक बाब आहे.

कलम ६६अ हे एक उदाहरण आहे की, चांगल्या हेतूने बनवलेला कायदा देखील चुकीच्या पद्धतीने वापरला गेला तर तो नागरिकांच्या हक्कांवर गदा आणू शकतो. डिजिटल युगात कायदे बनवताना स्वातंत्र्य आणि नियंत्रण यामध्ये समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा लोकशाहीचे प्राण आहे परंतु त्याचबरोबर सामाजिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच, भविष्यातील कायदे अधिक पारदर्शक, न्याय्य आणि नागरिकहिताचे असणे ही काळाची गरज आहे.